**फाईल क्र.1442/गट -क संयुक्त-दु.नि./2019/तेरा-ब** **दि.** 16 जुलै, 2020

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (मुख्य) परीक्षा-2019**

**- अंतिम निकाल -**

**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 6 व 20 ऑक्टोबर, 2019 रोजी **"महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-2019 मधील "दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (जाहिरात क्र. 15/2019)"** या संवर्गातील एकूण 33 पदांकरिता परीक्षा घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेले दावे निकालासाठी विचारात घेऊन सदर दाव्यांच्या अनुषंगाने शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता शासन स्तरावर, मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, सदर परीक्षेचा निकाल दि. 16 जुलै, 2020 रोजी जाहीर करण्यात आला आहे.

2. सदर परीक्षेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील **श्री. सरवटे विशाल कुमार (बैठक क्र. MB002261)** हे राज्यात प्रथम आले आहेत. तसेच मागासवर्गवारीतून व महिलांमध्ये **सांगली** जिल्ह्यातील श्रीमती शिंदे मनिषा नामदेव **(बैठक क्र. MB001358)** ह्या प्रथम आल्या आहेत.

3. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

4. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक 1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक 18 ऑगस्ट, 2016 व दिनांक 11 मार्च, 2019 रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-'क' पदासाठी निश्चित केलेली क्रीडाविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दि. 6 मे, 2019 रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व त्यासंदर्भातील उक्त दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

5. प्रस्तुत परीक्षेच्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांनी "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र. 3.8 पहावी).

6. सदर निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**उपसचिव (परीक्षा-2)**

**ठिकाण : मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग**